मुद्रा यशोगाथा

नाव :- मे. अभिसर मल्टीमेडिया प्रॉडक्शन
प्रोप्रा. श्री.तुषार अशोक दिवेकर, जि.कोल्हापूर

व्यवसाय :- ऑडिओ रेकॉर्डिंग विडिओ आणि फोटो एडिटिंग ग्राफिक डिजाइन प्रिंटिंग इ.

<u>लाभार्थ्याचे मनोगत :-</u>

श्री. तुषार दिवेकर हे २३ वर्षीय नवतरुण असून २०११ पासून सायबर चौक कोल्हापूर येथे त्यांचा भाड्याच्या जागेत रेकॉर्डिंग स्टुडिओ आहे. मे. अभिसार मल्टीमेडिया प्रॉडक्शन या नावाने त्यांची फर्म असून ते या फर्मचे प्रोप्रायटर आहेत. ते म्यूझिक कंपोजर असून ऑडिओ/विडियो रेकॉर्डिंग व एडिटिंग या सेवा ते २०११ पासून देत आहेत.

ऑडिओ/विडियो उपकरणे व मिक्सिंगसाठी व रेकॉर्डिंग स्टुडिओत अन्य प्रक्रियेसाठी लागणारे इतर साहित्य खरेदीसाठी त्यांनी बँकेकडे प्रधानमंत्री मुद्रा योजनेअंतर्गत रु. ७.५० लाख इतक्या रकमेचा कर्ज प्रस्ताव सादर केला. सदर कर्ज रकमेतून रेकॉर्डिंग स्टुडिओ उभारण्याचा त्यांचा मानस आहे. ज्यात गायक, इन्स्ट्रुमेंटल वाद्य वादक,जाहिरात व फिल्म इंडस्ट्रीमधील ध्वनी संकलन, इत्यादि अनेक सोयी सुविधा एकाच छताखाली मिळू शकतात. बँकेने त्यांना केलेल्या रुपये ७.५० लाख मंजूर कर्जातून त्यांनी वर नमूद केलेल्या सुविधांसाठी लागणारी उपकरणे व सामुग्री खरेदी केली आहे. सध्या त्यांचा व्यवसाय अतिशय जोमात सुरू असून त्याचे श्रेय ते बँक व प्रधानमंत्री मुद्रा योजनेला देतात.

-------



